www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक
# युवक आधार
मराठी

दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १६५ वा शनिवार दि. ०१ मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## एक शाम शिव के नाम

उत्कृष्ट संगीत सादरीकरण आणि महाशिवरात्री उत्सव साजरा



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : एक शाम शिव के नाम हे स्वरसंस्कार संगीत अकादमीतर्फे शिव महिमे साठी एक उत्कृष्ट संगीत सादरीकरण आणि डिएसआरफे फाउंडेशनतर्फे महाशिवरात्री उत्सव नील हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात आला होता.

प्रसिद्ध स्त्रीरोग, कर्करोग आणि गर्भ संस्कार तज्ज्ञ बी.के.डॉ. शुभदा नील यांनी महाशिवरात्रीचे रहस्य सांगितले. यावेळी माजी लेफ्टनंट कर्नल डॉ. वाय.डी. कौशिक योग गुरु, माजी नौदल अधिकारी दयालसिंग रावत योग शिक्षक, जितेंद्र तिवारी भाजपा उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य उत्तर भारतीय मोर्चा बिहार सेल 8 गार्डन चे योग शिक्षक, प्रभा सिन्हा आणि सखी शारदा भजन मंडळाचे सदस्य, कोराडे भाऊ, डॉ. इंदिरा चव्हाण, मंगला गडमुळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## स्वारगेट लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी 'दत्ता गाडे' ला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी

स्वारगेट बसस्टँड परिसरातील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडेला मध्यरात्री अटक करण्यात आली. शिरूर तालुक्यातील गुनाट गावातून त्याला बेड्या ठोकण्यात आल्या. मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास त्याला अटक करण्यात आली. त्यानंतर आज त्याला कोर्टात हजर केले असता, त्याला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

आरोपी दत्तात्रय गाडे याचा युद्धपातळीवर शोध सुरू होता. स्वारगेट बस स्थानकात तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्यानंतर तो आपल्या गुनाट या गावी गेला असल्याचे समोर आले होते. तसेच गावकऱ्यांनी त्याला गावात पहिल्याचे समोर आले होते. त्यानुसार पोलिसांनी गुनाट या गावातच त्याचा शोध घेण्याची ठरवले. त्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला. आणि गुनाट गावात आणि आजूबाजूच्या परिसरात त्याचा शोध सुरू झाला. ड्रोनच्या माध्यमातून उसाच्या परिसरात पोलीस त्याचा शोध घेत होते. मात्र सायंकाळपर्यंत तो सापडला नव्हता. अखेर काल मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास तो एका शेतात पोलिसांना सापडला. त्याला अटक करण्यात आल्यानंतर त्याला आज




न्यायालयात हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने त्याला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

**घडलेला प्रकार परस्पर सहमतीने- आरोपीचे वकिल**

स्वारगेट बसस्टँडवरील प्रकार हा परस्पर सहमतीने घडल्याचा दावा आरोपीच्या वकिलांनी केला आहे. आजच्या न्यायलयीन सुनावणीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी असे सांगितले की, आरोपी आणि ती तरुणी यांच्या जे घडले ते परस्पर सहमतीने घडले. त्यामुळे या लैंगिक अत्याचार किंवा बलात्कार म्हणता येणार नाही. आरोपीच्या वकिलांनी आरोपीची बाजू कोर्टात मांडली असली तरीही दत्ता गाडेचा मोबाईल मिसिंग आहे, तसेच त्याच्यासोबत कुणी आणखी माणसं होती का? अशा विविध गोष्टींची चौकशी करण्यासाठी दत्ता गाडेला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आल्याचे वकिलांनी सांगितले.


## नव्या पिढीचा आदर्श युवा शेतकरी –शुभम नारायण बेंडे!

**दैनिक युवक आधार**




**प्रतिनिधी- महेश पेंन्दोर । (रातचांदना) यवतमाळ** : यवतमाळ तालुक्यातील रातचांदना गावातील युवा शेतकरी शुभम नारायण बेंडे यांनी आधुनिक शेतीत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी २ एकर क्षेत्रावर टरबूज आणि २ एकर क्षेत्रावर खरबूज यशस्वीपणे लागवड केली असून, सध्या या प्लॉट्सना दोन महिने पूर्ण झाले आहेत. गतवर्षीच्या तुलनेत यंदा अधिक उत्पादन होण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या मागे न लागता,शेतीत नवे प्रयोग करून आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करत उत्पादनवाढ साध्य करणाऱ्या शुभम यांची जिद्द आणि मेहनत निश्चितच प्रेरणादायी आहे. तरुण शेतकऱ्यांसाठी ते एक उज्ज्वल मार्गदर्शक ठरत आहेत.

==============================























# पोस्को महाराष्ट्र स्टील तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी नकाशे व इतर साहित्य वाटप - गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संकल्प

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :-सचिन पवार । माणगांव रायगड । माणगांव** :–शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा मूलभूत आधार असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न होणे आवश्यक आहे. पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत परिसरातील ५५ शाळांमध्ये नकाशे वाटप उपक्रम राबवून शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. या उपक्रमांतर्गत जवळपासच्या ५ केंद्रशाळा आणि इतर ४४ शाळांचा समावेश आहे. तसेच ६ माध्यमिक शाळांमध्येही नकाशे वितरित करण्यात आले आहेत.

शालेय शिक्षणात नकाशांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असून, भौगोलिक संकल्पना समजावून घेण्यासाठी ते उपयुक्त ठरतात. ही गरज लक्षात घेऊन पोस्को महाराष्ट्र स्टीलने प्रत्येक शाळेसाठी वर्गानुसार ४–४ नकाशे वितरित केले, ज्यामध्ये जग, भारत, राज्य, जिल्हा यांचे भौगोलिक नकाशे, पृथ्वीगोल, भिंग, घड्याळ, फुटबॉल यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना नकाशांचा योग्य प्रकारे उपयोग करता यावा आणि त्याचा अभ्यासात अधिक प्रभावी वापर करता यावा, यासाठी कंपनीच्या विविध विभागातील ३४ अधिकाऱ्यांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून मार्गदर्शन केले. नकाशा वाचनाचे महत्त्व समजावून देत, नकाशांमधून कोणती माहिती मिळते, त्यांचा अभ्यास कसा करावा आणि त्यांचा प्रभावी उपयोग कसा करता येईल यावर चर्चा करण्यात आली.या उपक्रमावर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एका विद्यार्थ्याने सांगितले, “आम्हाला भूगोल शिकताना नकाशांचा वापर करणे सोपे आणि अधिक रुचकर वाटते. पूर्वी आम्हाला केवळ पुस्तकातील नकाशांवर अवलंबून राहावे लागत असे, पण आता मोठ्या प्रमाणात नकाशे उपलब्ध झाल्यामुळे आम्ही वेगवेगळ्या प्रदेशांची माहिती अधिक स्पष्टपणे समजू शकतो.”

शाळेतील शिक्षकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. शिक्षकांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, “विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नकाशांचा वापर करून शिकवता आल्यास त्यांच्या आकलन क्षमतेत वाढ होते. पोस्को महाराष्ट्र स्टीलने दिलेल्या या नकाशांमुळे आमच्या अध्यापन प्रक्रियेत मोठी मदत झाली आहे. हे नकाशे केवळ भूगोल शिकण्यासाठीच नाही तर इतिहास, नागरीकशास्त्र आणि पर्यावरण विषयांसाठीही उपयुक्त ठरणार आहेत.”पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी केवळ उद्योग क्षेत्रातच नव्हे, तर समाजाच्या विकासातही मोलाची भूमिका बजावत आहे. शिक्षणाच्या विकासासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा संकल्प कंपनीने केला आहे. या उपक्रमामुळे माणगांव परिसरातील विद्यार्थ्यांना भूगोल विषयाची अधिक सखोल समज मिळेल आणि त्याचा त्यांना भविष्यात नक्कीच उपयोग होईल. शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पोस्को महाराष्ट्र स्टीलचा हा उपक्रम निश्चितच महत्त्वाचा ठरेल.

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी शिक्षण क्षेत्रात सातत्याने योगदान देत असून, स्थानिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणसाहित्य आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. याआधीही कंपनीने शाळांना संगणक, शालेय साहित्य, तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवले आहेत. कंपनी केवळ भौतिक साहित्य किंवा भौतिक सुविधा पुरवण्यावर भर न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करत आहे. भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवण्याचा मानस पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

====================



## राजगुरूनगरच्या अश्विनी राजेंद्र पाचारणे यांना "सहकार रत्न"पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**स्नेहा उत्तम मडावी पुणे** : खेड येथील राजगुरुनगर सहकारी बँकेच्या संचालक तसेच शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या पुणे जिल्हाध्यक्ष अश्विनी राजेंद्र पाचारणे यांना नुकताच इचलकरंजी येथील पोलीस मित्र असोसिएशन व वेध फाऊंडेशनच्या वतीने सहकार रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार रविवार दि ९ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. अश्विनी राजेंद्र पाचारणे यांचे महिलांच्या सबलीकरणासाठी मोठे योगदान आहे. सामाजिक सांस्कृतिक साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. समाजाच्या उन्नतीसाठी अश्विनीताई सतत कार्यरत असतात तरूणांना उद्योग व्यवसायासाठी मदत करीत असतात. महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांच्या हाताला देवून त्यांचा संसार सुखाचा होण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत असतात. राजगुरुनगर सहकारी बँकेच्या माध्यमातून अनेकांना कर्ज उपलब्ध करून देऊन त्यांचा व्यवसाय उभारणी साठी मदत करीत असतात. अश्विनीताई पाचारणे यांना जाहीर झालेल्या पुरस्काराचे सर्व थरांत कौतुक होत आहेत अनेकांच्या शुभेच्छा येत आहेत.



## उपक्रमशील शिक्षकांचा विनोबा ॲप मधील उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान



**दैनिक युवक आधार**

**संदीप मापारी (लोणार)** : जिल्हा परिषद बुलढाणा व ओपन लिंक फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करार अंतर्गत राबविण्यात येणारा आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम अर्थात विनोबा(बा) अप च्या माध्यमातून जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांना प्रत्येक महिन्यात प्रोत्साहन पर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

जानेवारी महिन्यातील तालुका स्तरावरील 'पोस्ट ऑफ द मंथ' विजेते किरण शेषराव भिसडे मॅडम/सौ. शीतल ज्ञानेश्वर मापारी यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचे नावीन्यपूर्ण उपक्रम व आगळे वेगळे प्रयोग सातत्याने शालेय स्तरावर करत असतात. त्यांनी राबवलेले प्रयोग, उपक्रम त्यांच्या शीतल मापारी या यूट्यूब चैनलवर अपलोड करत असतात. त्यांच्या नावीन्यपूर्ण हसत खेळत उपक्रमांमुळे विद्यार्थी उपस्थिती वाढली आहे. " पोस्ट ऑफ द मंथ"हा पुरस्कार विस्तार अधिकारी कुंभारे सर सोबतच केंद्रप्रमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचे शिक्षकांना आवाहन केले. यावेळी कार्यक्रमाला सर्व केंद्रप्रमुख ,सर्व विषयसाधनव्यक्ती समग्र प्रशिक्षणार्थी शिक्षक तथा ओपन लिंक फाउंडेशनचे अजय राठोड (जिल्हा समन्वयक) उपस्थित होते.

## महाशिवरात्री निमीत्त नंदिनीताई मैद महाराज यांचे महासांगवी येथे किर्तन संपन्न



**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : श्री क्षेत्र मिराबाई आईसाहेब संस्थान, महासांगवी येथील आईसाहेब वारकरी शिक्षण संस्थेची विद्यार्थीनी कु.नंदिनीताई मैद महाराज यांचे महाशिवरात्री निमित्त संस्थानच्या मठाधिपती महंत राधाताई महाराज (आईसाहेब) यांच्या मार्गदर्शनाखाली महासांगवी संस्थानवर किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. शिव भोळा चक्रवर्ती! त्याचे पाय माझे चित्ती!! वाचे वदता शिवनाम! तया न बाधी बोधकाम!! या संत नामदेव महाराजांच्या अभंगावर ह.भ.प.कु. नंदिनीताई मैद महाराज यांनी निरुपन केले. या वेळी प्रभाकर महाराज मैद, तांबडे महाराज, विशाल महाराज गिरी, उपसरपंच केशव गर्जे, सर्जेराव गर्जे, समाजसेवक स्वामी सानप, शिवाजीराव गर्जे, किसनदेव सानप, पत्रकार विजय जाधव यांच्या सह महासांगवी व परिसरातील भाविकांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. या वेळी सर्व उपस्थित भाविकांची फराळाची व्यवस्था झुंबर हनुमंतराव गर्जे(बीड पोलीस) यांनी केली.

# कौशल्य विकास व उद्यमशीलता मंत्रालय-आयएचसीएल’ स्किल डेव्हलपमेंट करार

## कार्यशाळेत आवश्यक मूलभूत माहिती आणि हॉस्पिटॅलिटी कौशल्ये संपादन करता येतील

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, २८ फेब्रुवारी २०२५** : भारतातील सर्वात मोठी हॉस्पिटॅलिटी कंपनी, इंडियन हॉटेल्स कंपनीने (IHCL) हल्लीच केलेल्या एका घोषणेनुसार त्यांनी गोवा सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्यमशीलता मंत्रालयासोबत एक समझोता करार केला आहे. राज्यातील युवकांना जास्तीत जास्त रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी देशातील सर्वात मोठे हॉस्पिटॅलिटी स्किलिंग सेंटर गोव्यामध्ये सुरु करण्यासंदर्भात हा करार करण्यात आला आहे. गोव्याचे माननीय मुख्यमंत्री श्री प्रमोद सावंत, शिक्षण आणि कौशल्य विकास मंत्रालयाचे सचिव श्री प्रसाद लोलयेकर, आयएएस आणि गोव्याचे कौशल्य विकास आणि उद्यमशीलता संचानालयाचे संचालक श्री एस एस गावकर यांच्या उपस्थितीत हा स्वाक्षरी समारंभ पार पडला.श्री पुनीत छटवाल, मॅनेजिंग डायरेक्टर, इंडियन हॉटेल्स कंपनी म्हणाले,"गेल्या पाच दशकांहून अधिक काळापासून गोव्यामध्ये आघाडीचे स्थान भूषवत असलेली IHCL गोव्याच्या हॉस्पिटॅलिटी क्षेत्राला अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी वचनबद्ध आहे. आगामी स्किलिंग सेंटर आमच्या 'पाठ्य'च्या ईएसजी+ फ्रेमवर्कला अनुसरून रोजगारक्षमतेमधील कमतरता भरून काढेल आणि कुशल मनुष्यबळ निर्माण करेल, जे गोव्यातील प्रवास आणि पर्यटन उद्योगक्षेत्रासाठी अनुकूल ठरतील."





श्री प्रमोद सावंत, मुख्यमंत्री, गोवा म्हणाले,"गोवा हे भारतातील आघाडीचे पर्यटनस्थळ आहे, पर्यटनाचे केंद्र ही गोव्याची ओळख दीर्घ काळापासून टिकून आहे. आयएचसीएलच्या या उपक्रमामुळे युवकांसाठी नवीन रोजगार संधी निर्माण होतील, पर्यटन उद्योगक्षेत्रात सातत्यपूर्ण वृद्धी व प्रगती घडवून आणण्याच्या गोव्याच्या व्हिजनला पाठिंबा मिळेल. शाश्वत पर्यटन इको–सिस्टिम विकसित करण्याच्या आम्ही आणि आयएचसीएल देखील बांधील आहे व हा समझोता करार त्याच बांधिलकीचे प्रतिबिंब आहे. या उपक्रमासाठी भारतातील आघाडीची हॉस्पिटॅलिटी कंपनी आयएचसीएलसोबत हातमिळवणी करताना आम्हाला आनंद होत आहे."


हे स्किलिंग सेंटर विशेष तयार करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांची आणि कार्यशाळांची एक शृंखला प्रस्तुत करेल, उद्योगक्षेत्राच्या नवनवीन मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे कार्यक्रम आणि कार्यशाळा डिझाईन करण्यात आल्या आहेत. या सत्रांमध्ये आवश्यक मूलभूत माहिती आणि हॉस्पिटॅलिटी कौशल्ये संपादन करता येतील, यामध्ये भाग घेणाऱ्यांना सेवा क्षेत्रात करियर करण्यासाठी सक्षम बनवले जाईल. यामध्ये इंडस्ट्री–बेस्ड इंटर्नशिप देखील पुरवली जाईल, ज्यामध्ये कॉर्पोरेट वातावरणामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येईल, शिक्षण आणि रोजगार यांच्यातील अंतर दूर केले जाईल.

## समुद्रातच मच्छीमार बोटीला लागली आग

**18 ते 20 खलाशी असल्याची माहिती, बोट जळून खाक**

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : आक्षी गावातील अलिबाग जवळ समुद्रात मच्छीमार बोटीला आग लागल्याची घटना घडली आहे. भर समुद्रात बोटीने पेट घेतला आहे. या आगीत बोट 80 टक्के जळून खाक झाली आहे. बोटीवरील जाळी देखील जळाली आहे. बोटीच खूप प्रमाणात नुकसान झालय बोटीवर 18 ते 20 खलाशी असल्याची माहिती आहे. बोटीवरील सर्व खलाशी सुखरुप आहेत. आज सकाळी ही घटना घडली आहे. पहाटे तीन ते चार वाजेचे दरम्यान बोटीला लागली आग मिळालेल्या माहितीनुसार, साखर आक्षी गावातील राकेश मारुती गण यांच्या मालकीची ही बोट आहे. दरम्यान, आगीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. शॉर्ट सर्किटमुळं ही आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. स्थानिकांच्या मदतीनं ही बोट किनाऱ्यावर आणली आहे. सध्या आग विझविण्याचं काम सुरु आहे. साखर आक्षी येथील राकेश गण यांच्या मच्छीमारी बोटीला समुद्रामध्ये सहा ते सात नोटिकल मैल अंतरावर पहाटे तीन ते चार वाजेचे दरम्यान इलेक्ट्रिक शॉक सर्किट होऊन आग लागल्याची माहिती मिळाली आहे. त्या ठिकाणी मदतीला कोस्ट गार्ड व नेवीच्या बोटी मदतीला पोहोचलेल्या असून सर्व खलाशी सुरक्षित आहेत. दरम्यान, समुद्रात अचानक बोटीने पेट घेतल्यामुळं खलाशांमध्ये भीतीचं वातावरण होतं. पण आगीची माहिती मिळताच स्थानिकांच्या साथीनं बोट समुद्रकिनारी नेण्यात आली आहे.



## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना सहकार्य करणाऱ्या व्यक्तीवर योग्य ते गुन्हे दाखल करू :- तहसीलदार सोनाली जोंधळे

**दैनिक युवक आधार**

**मंठा (प्रतिनिधी)**- मंठा तालुक्यातील अवैद्य वाळू वहन करण्यासंदर्भात तहसिल प्रशासनामार्फत संबंधित गावातील जे नागरिक अशा अवैध कृत्यात सहभागी असल्यास त्यांना भविष्यात होणा–या कायदेशीर कारवाईबाबत माहिती देऊन त्यांना अशा अवैध कृत्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करावा. आणि प्रशासनास सहाकार्य करावे, असे आवाहन मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी प्रेस नोट द्वारे केले आहे.

महसूल प्रशासनाच्या वतीने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, मंठा तालुक्यातील सर्व वाळू घाट / वाळू असलेल्या गावातील (टाकळखोपा, वाघाळा, किर्ला, दुधा, सासखेडा, खोरवड, वडार सरकटे, भुवन, पोखरी केंधळी, लिंबखेडा, पाटोदा, आर्डा खारी) नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अवैध वाळू वहन करणा–या वाहनांवर कारवाई करतांना असे आढळून आलेले आहे की, सदर बाहनामध्ये वाळू भरण्याचे काम हे संबंधित गावातील नागरिकच करत असतात. बरेच वेळा त्यात महिला व अल्पवयीन मुले यांचाही समावेश दिसून येतो. तसेच कारवाई करताना अल्पवयीन मुले ही विनानंबर दुचाकी वाहनावरून कारवाई दरम्यान अडथळा आणण्याचेही प्रकार निदर्शनास आलेले आहेत. (अशा कृत्यामुळे अपघात होऊन संबंधित व्यक्तीच्या जीवितास देखील धोका पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही.) तसेच महसूल पथकाचा पाठलाग करणे, विना नंबर प्लेट गाड्या, नंबर खाडाखोड केलेचे आढळून येत आहे.

पथकामार्फत अवैधरित्या वाळू वाहनात भरून देणारे महिला, पुरुष, अल्पवयीन मुले यांना अधिकतम वेळेस तोंडी समज देऊन सोडण्यात येते. या अवैध वाळू चोरी प्रकरणात प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या सहभाग असलेल्या नागरिकांना या जाहीर प्रगटनाव्दारे अंतिम समज देण्यात येते की, यापुढे वाळूचोरी सारख्या अवैध कृत्यात अप्रत्यक्षरित्या सहभाग असलेल्या स्त्री असो वा पुरुष अथवा अल्पवयीन मुले अशांवर कारवाई दरम्यान सदर व्यक्ती सहभागी असल्याचे आढळून आल्यास भारतीय न्याय संहिता (बी. एन. एस.), २०२३ मधील कलम १३२, ३०३(२), २२१, २८१, ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३), १८९ (२), १९१(२), १९०, व खाण अधिनियम, १९५२ कलम ३ व ४, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) (८), तसेच 1. Motor Vehicle act 1988, 2. Central motor vehicle rules 1989, 3.Maharashtra motor vehicle rules 1989, Bombay motor vehicle tax act 1958 नुसार गुन्हा दाखल करण्यात येईल. अशा गुन्ह्यांत वारंवार सहभागी असल्याचे निष्पन्न झाल्यास प्रसंगी हद्दपारीचीही कारवाई प्रस्तावित करण्यात येईल यांची गंभीर नोंद संबंधीत गावातील नागरिकांनी घ्यावी. तसेच मंठा तहसिल प्रशासनामार्फत सदर गावातील सरपंच यांना देखील सुचित करण्यात येते की, आपले गावातील जे नागरिक अशा अवैध कृत्यात सहभागी असल्यास त्यांना भविष्यात होणा–या कायदेशीर कारवाईबाबत माहिती देऊन त्यांना अशा अवैध कृत्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत करावा. आणि प्रशासनास सहाकार्य करावे, असे तहसिलदार सोनाली जोंधळे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

## उरण मधील दिव्यांगानीही लुटला मनमुराद आनंद

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर । उरण रायगड** : उरण दिव्यांग सामाजिक संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबासोबत दोन दिवस रानसाईवाडी येथील जे.डी. जोशी फार्म हाऊस वर २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ या दोन दिवसात आनंद लुटला. इतर





सामान्य माणसांप्रमाणे दिव्यांग कुटुंब आनंद लुटू शकत नाहीत. पण मागील तीन वर्षापासून उरण दिव्यांग सामाजिक संघटनेच्या सर्व सदस्य हे त्यांच्या कुटुंबासमवेत दोन दिवस गेट–टुगेदर करत असतात आणि या गेट–टुगेदर मध्ये आपल्या कुटुंबासमवेत हसत, खेळत, नाचत, स्विमिंग पूल चा आनंद घेत असतात. सर्वजण एकत्र जेवण बनवणे, त्याचबरोबर संघटनेमध्ये आत्तापर्यंत चांगले काम केलेले आहे त्यांचा सत्कार समारंभ करत असतात.या दोन दिवसीय आनंदामध्ये त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळीच चमक दिसून येते. प्रत्येक दिव्यांग कुटुंबातील सदस्य मनमुराद आनंद लुटत असतो. या दिव्यांग कुटुंबांना एकत्र आणण्यासाठी दिव्यांग सामाजिक संघटनेचे सर्व पदाधिकारी खूप मेहनत घेतात. त्यामध्ये संदेश राजगुरू, महेश पाटील, महेंद्र म्हात्रे, उमेश पाटील, राजेंद्र पाटील, समीर ठाकूर, मदन पाटील, राकेश पाटील,हे सर्व उरण तालुक्यातील वेगवेगळ्या गावातील सदस्य असून हे सर्व एकत्र येऊन खूप मेहनत घेत असतात.

आलेल्या कुटुंबासोबत संवाद साधत असताना या दिव्यांग बांधवांच्या पत्नी अशा म्हणत होत्या की, आम्हाला समाजात वावरत असताना कधीकधी संकोच वाटत असतो. पण या दोन दिवसीय गेट–टुगेदर मध्ये आम्ही आमच्या कुटुंबासमवेत आणि इतर दिव्यांग सहकाऱ्यांसमवेत आनंद लुटत असतो.आम्हाला सगळ्यांसोबत खूप मज्जाही करायला मिळते कारण इथे येणारा प्रत्येक दिव्यांग असल्यामुळे आमच्या मनात कोणताच संकोच नसतो. एकंदरीत सदर दोन दिवसीय गेट–टुगेदर मुळे आमच्यामध्ये चांगल्या प्रकारे उत्साह निर्माण होतो. या दोन दिवसात घालवलेल्या आनंदाच्या क्षणामुळे पुढील येणाऱ्या दिवसात आमच्या चांगल्या प्रकारे जगण्याची उमेद मिळते. एकंदरीत दोन दिवसीय गेट–टुगेदर उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पाडण्यात आले.

## यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे प्रमोद बगाडे यांचा सत्कार



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी- महेश पेंन्दोर । यवतमाळ,दि.28 फेब्रुवारी** : यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी प्रमोद बगाडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन,आर्णी रोड, यवतमाळ येथे भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.आज,२८ फेब्रुवारी (शुक्रवार) रोजी हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे,माजी सामाजिक कल्याण मंत्री शिवाजीराव मोघे,यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब मांगुळकर,यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल मानकर,माजी शिक्षण मंत्री वसंतराव पुरके,काँग्रेस कमिटीचे राज्य महासचिव तातूभाऊ देशमुख यांनी उपस्थित राहून नव्या जिल्हाध्यक्षांचे अभिनंदन केले.तसेच यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस जितेंद्र मोघे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रवीण देशमुख,साहेबराव कांबळे, संजय ठाकरे आदी मान्यवरांनीही उपस्थिती लावून प्रमोद बगाडे यांचे अभिनंदन केले.यावेळी मान्यवरांनी युवक काँग्रेसच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करत युवा कार्यकर्त्यांनी पक्ष संघटन अधिक बळकट करावे आणि काँग्रेस विचारधारा समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचवावी,असे आवाहन केले. तसेच प्रमोद बगाडे यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेस अधिक सक्षम होईल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाला यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, युवक काँग्रेसचे असंख्य कार्यकर्ते आणि पक्षाचे निष्ठावान सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कारानंतर पक्ष संघटन व भविष्यातील कार्ययोजना यावरही चर्चा करण्यात आली.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# शिवशक्ती मित्र मंडळातर्फे होळी, शिवजयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन




**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर :** दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या लाईन आळी येथील शिवशक्ती मित्र मंडळातर्फे होळी तसेच शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दि.13/03/2025 रोजी होम (होळी पूजन), तसेच महिलांसाठी विविध क्रिडा स्पर्धा व पाचवी ते 10 वी च्या मुलांचे क्रिकेट सामने, शनिवार दि.15/03/2025 रोजी सांस्कृतिक कार्यक्रम, वेशभूषा, सिंगल डान्स, ग्रुप डान्स इ., रविवार दि.16/03/2025 रोजी लाईन आळी प्रिमियर लिग 2025 (वर्ष 10 वे) भव्य ऑक्शन सोहळा, सोमवार दि.17/03/2025 रोजी शिवजयंती उत्सव तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे बक्षिस वितरण समारंभ आणि मराठी व हिंदी गीतांचा सदाबहार कार्यक्रम, मंगळवार दि.18/03/2025 रोजी मंडळातर्फे विभागातील नागरिकांसाठी कराओके गाण्यांचा एक आगळा वेगळा कार्यक्रम, बुधवार दि.19/03/2025 रोजी श्री सत्यनारायणाची महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मार्गदर्शक रमेश गुडेकर, संस्थेचे अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष रवि (पिंट्या) गोरे, कार्याध्यक्ष खंडेश धनावडे, समीर कदम, सहकार्याध्यक्ष प्रकाश (नानु) वाघे, सहकार्याध्यक्ष प्रवीण पोवार, खजिनदार संतोष तळेकर, हिशोब तपासनीस अरुण ठाकूर, संयुक्त चिटणीस प्रशांत नरसाळे, सहखजिनदार अनिकेत जाधव आदी आहेत. दरवर्षी या मंडळातर्फे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना एक हजार वह्यांचे वाटप वर्षातून येणाऱ्या पालख्यांना तसेच 26 जानेवारी, 15 ऑगस्ट, शिवजयंती, गुढीपाडवा या दिवशी सरबत, दुध कोल्डींक्स, पाणी, बिस्किट वाटप त्याचप्रमाणे मंडळातील गरीब कार्यकर्त्यांना नवीन शर्ट-पॅन्ट, गणवेश वाटप आणि अनाथ आश्रमामध्ये आर्थिक व नित्त उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येते. अधिक माहितीसाठी रमेश (दादा) गुडेकर फोन नं.9870434350 येथे संपर्क साधावा.

# बौद्ध गया महाविहार बौद्ध अनुयायांच्या ताब्यात द्या- फुले, शाहु, आंबेडकर सामाजिक संघर्ष कृती समितीची मागणी



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधीः- योगेश पालोदकर । सिल्लोडः-** बौद्ध गया महाविहार हे बौद्ध अनुयायांच्या ताब्यात द्या यासाठी फुले, शाहु, आंबेडकर सामाजिक संघर्ष कृती समिती सिल्लोड च्या वतीने तहसीलदार संजय भोसले यांच्या मार्फत राष्ट्रपती यांना निवेदन देण्यात आले. सर्व जगातील बौद्धांच्यासाठी बिहार प्रदेशातील बुद्धगया हे अत्यंत पवित्र स्थळ आहे.सहा वर्षे अत्यंत खडतर तपःश्चर्या केल्यावर बुद्धगयेतील महाबोधी वृक्षाखाली तथागत भगवान बुद्धांना बुद्धत्व प्राप्त झाले. आणि सम्यक संबुद्ध झाले .बुद्धधम्म बिहारमध्ये निर्माण झाला,बिहारमध्ये वाढला आणि बिहारमधूनच सर्व जगभर पसरला.मौर्यानी आणि गुप्तांनी बिहारमधूनच सर्व भारतभर राज्य केले.नालंदा,ओदांतपुरी आणि विक्रमशिला ही जगप्रसिद्ध बौद्ध विश्वविद्यालये बिहारमध्येच होती.

**बुद्धगया मंदिर कायदा १९४९ रद्द करा** – जगभरातील आम्हा सर्व बौद्धांचे धार्मिकस्थान असलेल्या बुद्धगया येथील, ` महाबोधी महाविहाराचा ' ताबा आम्हाला मिळावा यासाठी राष्ट्रीय स्तरावर मोठे आंदोलन सुरु आहे. यापूर्वी सन १८९१ ला पुजनीय भन्ते धम्मपाल अनागरिक यांनी महाबोधी विहार मुक्ती साठी मोठे आंदोलन केले होते. तसेच त्यानंतर हे आंदोलन संपूर्ण देशभरात भदंत नागार्जुन, भदंत सुरई ससाई यांनी चालवले, तरी सुद्धा हे महविहार हे बुद्ध अनुयायी च्या ताब्यात आले नाही. हे महाविहार सर्व जगातील बौध्द अनुयायींचे स्फूर्ती स्थान असून लागू असलेला १९४९ कायदा रद्द करून महाबोधी विहार बौद्ध अनुयायींचा ताब्यात देण्यात यावे.नसता बौध्द अनुयायींच्या वतीने मोठे जनआंदोलन उभे करण्यात येईल यांची आपण नोंद घ्यावी. असे निवेदनात म्हटले असून निवेदनावर माजी उपनगरध्यक्ष संजय आरके, संयोजक के. के जगताप, प्रभाकर पारधे, अशोक सोनवणे, नगरसेवक जितु आरके, अमित आरके, माणिक जगताप, निलेश जगताप, संदीप दोडे, दिलीप गवळी, पंगा आरके, अतुल साळवे, दिवक बिरारे, अशोक गायकवाड, संजय आरके,दयानंद आरके, संतोष कोतकर, गौतम भुईगळ,राजू रोजेकर,अर्जुन शेळके,संजय बिरारे,संदीप बावस्कर,अक्षय वाघ, महेंद्र सरोदे,संजय सुरडकर,अतिष सुरडकर,डॉ. ताहेर, रोहीत नाटेकर, राजू साठे. यांची उपस्थिती होती.

# श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव

## (क्रीडा सह्याद्री फाउंडेशन नाशिक व शिव अविष्कार स्पोर्ट्स फांऊंडेशन नाशिक ने केला राष्ट्रीय खेळाडूंचा शिवरत्न क्रिडा पुरस्कार पुरस्काराने सन्मानित)



**दैनिक युवक आधार**

**निफाड प्रतिनिधी । राहुल कुलकर्णी । निफाड :** शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशन नाशिक व क्रीडा सह्याद्री निफाड व टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक आयोजित श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त राज्य व राष्ट्रीय खेळाडूंना सरस्वती विद्यालय निफाड येथे शिवरत्न क्रीडा गौरव पुरस्कार -2025 देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी सरस्वती विद्यालयाचे चेअरमन नंदलालजी चोरडिया, सरस्वती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योती बागडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले . या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी म्हणून मा.उपमुख्याध्यापक बाळकृष्ण काशिनाथ ठोके (शास्त्रीय संस्कृत अध्यापक) वैनतेय विद्यालय निफाड.श्री विजय बाळकृष्ण डेर्ले मुख्याध्यापक जि.प. प्राथ.शाळा जळगाव,राहुल कुलकर्णी, विनोद गायकवाड , शिव अविष्कार स्पोर्ट्स फांऊंडेशन चे अध्यक्ष विलास गायकवाड ,रमेश वडघुले ,संजय बागुल उपस्थित होते.याप्रसंगी शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशन अध्यक्ष विलास गायकवाड यांनी खेळाडूना मार्गदर्शन केले व क्रीडा क्षेत्रामध्ये आपण करिअर करू शकता हे सांगितले. खेळाडूंचा सन्मान कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व प्रमुख पाहुणे बाळकृष्ण ठोके व विजय डेर्ले यांच्या हातून विद्यार्थ्यांचा करण्यात आला. त्यामध्ये अनंती आहेर ,पियुषा अहिरे ,पलक पवार,पुर्वा निकम , वेदश्री कापडणीस , नूतन काकुळते ,जानव्ही नेरकर, वेदिका केकान,हर्षल भूषण ठोके , उत्कर्ष नितीन ठाकरे ,श्लोक गणेश आहेर ,शिव प्रवीण ठोके,सोहम भूषण कापडणीस,आयुष गणेश भदाने , शौर्यर सुनील चव्हाण, आयुष पंकज बागुल ,आदित्य गोरक्षनाथ धारराव ,खुशाल योगेश भामरे ,करण राम रसाळ,साहिल संजय प्रसाद ,आर्यन जितेंद्र खरे ,स्मित घुमरे ,राम रुपेश पाटील ,प्रसाद विजय पवार , साई गोरक्षनाथ हलवार ,रितेश रुपेश पाटील ,रुद्राक्ष पंकज सोनवणे , साईराज रामेश्वर गोजरे, वेदांत प्रमोद गुरव ,सोहेल शाहिद मुजावर,युवराज दिपक काळे ,आदित्य गोरख पाटील ,अभिजीत विश्वजित बोरसे,तेजस भाऊसाहेब जोंधळे,मानवराजे वाघ,कार्तिक मोरे,विजय घोटेकर , श्लोक कुलकर्णी, दक्ष विनोद गायकवाड, कुमार अवदेश कुमार साह, जय सुधाकर डबाळे,ओम संजय आहेर , सोहम भिमराज मोरे, कार्तिक मोरे, आदित्य वाघ,सिद्धेश मेमाणे, रागिनी आहेर इ.सर्व खेळाडूंना शिव रत्न क्रीडा पुरस्कार 2025 देऊन सन्मानचिन्ह, गौरवपदक, मानाचा फेटा अशा स्वरूपात मान्यवरच्या शुभहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. .तसेच या खेळाडू महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव मीनाक्षी गिरी ,क्रीडा सह्याद्री नाशिक अध्यक्ष विलास गायकवाड यांनी या सर्व खेळाडूंचा अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलम बेंडकुळे यांनी केले व आभार विलास गायकवाड यांनी मानले.

====================

# सापडलेला मोबाईल मूळ मालकास परत; गोळी चाकलेट विक्रेते फिरोज मनियार यांच्या प्रामाणिकतेचे कौतुक




**दैनिक युवक आधार**

**प्रशांत तांबोळकर लातुर । शिरूरआनंतपाळ :** अनेकदा फोन हरविण्याच्या घटना घडत असतात, मग कुठे रस्त्यात, बसमध्ये,मोटार सायकलवर जाताना प्रवास करताना अगदी कुठेही. मात्र अनेकदा हे मोबाईल सापडत नाहीत. पण काहीवेळा माणुसकीमुळे अनेकजण मोबाईल परत करतात. आज प्रत्येकाजवळ स्मार्ट फोन आहे, मात्र एकदा हरवला की परत मिळणे कठीण होऊन बसते. तर काहीवेळा अनेक अनोळखी माणसे स्वतःहून मोबाईल परत करत असतात.

तसाच काहीसा प्रकार येरोळ ता.शिरूरआनंतपाळ येथे पहायला मिळालं. शुक्रवारी सकाळी चाकुर येथील एक तरुण फिरोज मनियार हे येरोळ येथील किराणा दुकाणदारांना चॉकलेट, गोळी विक्रीसाठी घेऊन येत असताना येरोळकडे येणाऱ्या रस्त्यावर त्यांना विवो कंपनीचा मोबाईल अंदाजे किंमत पंच्चवीस हजार रुपयेचा सापडला. याच रोडवरून येरोळमोडकडे जाणाऱ्या एक दोघांना त्यांना मोबाईल सापडला असल्याचे सांगितले परंतु एकाने माझाच हरवला असल्याचे सांगितले. परंतु फिरोज मनियार यांनी सद् विवेक बुध्दीप्रमाने सापडलेला मोबाईल येरोळ येथील जेष्ट पत्रकार तांबोळकर यांच्या दुकाणात ओळख दाखवुन मोबाईल घेवून जाण्याचे सांगितले. सुमठाणा येथील सामाजीक कार्यकर्ते जर्नाधन पाटील हे येरोळमोड येथील पेट्रोलपंपावर मोटार सायकलमध्ये पेट्रोल टाकुन येत असतांना वरच्या खिशातुन मोबाईल कधी पडला हे त्यांच्याही लक्षात आले नाही. एक तासा नंतर जर्नाधन पाटील हे खिसे तपासताना मोबाईल नसल्याचे लक्षात आले.

त्यांनी दुसऱ्याच्या मोबाईलवरुन त्यांच्या मोबाईलला फोन केले असता फिरोज यांनी मोबाईल सापडल्याचे सांगितले.फिरोज यांनी तांबोळकर यांच्या किराणा दुकाणात आणुन जर्नाधन पाटील यांचा हरवलेला मोबाईल एक रुपया बक्षीस न घेता परत केला. रोडवर सापडलेला मोबाईल मुळ मालकास परत केल्याबदल चॉकलेट विक्रेते फिरोज मनियार चाकुर यांच्या प्रामाणिक पणा बदल सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# पी. आर. पी. इंग्लिश स्कुल पाणदिवे येथे मराठी राजभाषा दिन गौरवात साजरा

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी । हेमाली पाटील । दि. 28 फेब्रुवारी :** हुतात्मा परशुराम रामा पाटील संस्थेचे पुंडलिक रामा पाटील इंग्लिश स्कुल पाणदिवे, उरण येथे मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा झाला. 27 फेब्रुवारी हा दिवस कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रभर मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो .मराठी राजभाषा गौरव दिनाची सुरुवात कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमचे पुजन करून झाली. प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. सोनाली पाटील मॅम यांच्या शुभहस्ते या सोहळ्याचा शुभारंभ झाला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यार्थी व शिक्षकांनी मराठी भाषेनिमित्त छान माहिती दिली.

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त, कवी, ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर यांना या शाळेतील विद्यार्थांनी साहित्यरुपी मानवंदना दिली.ओवी, बालगीत, अभंग, भारूड, नाटक, शब्दकोडी, साहित्याचे प्रकार विद्यार्थ्यांनी सादर केले.त्यांचप्रमाणे थोर महान संत, समाजसुधारक, कवी, वारकरी, शेतकरी, कोळी, बाळगंधर्व, सावित्रीबाई व जोतिबा फुले, संत ज्ञानेश्वर, मुक्ताई, डॉ. आंनदी बाई जोशी, कवी कुसुमाग्रज, बालकवी, साने गुरुजी, शाहीर,अशा विविध थोर विभूतींची वेशभूषा करून भूमिका निभावल्या. इयत्ता पहिली ते नववी च्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.या विद्यार्थ्यांना शाळेतील मराठी विषयाच्या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.




# चिमुकलीच्या जन्मदीना निमीत्य मुक बधिर विध्यार्थीना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी । महेश पेंन्दोर :** आपल्या सामाजिक भावनेतून इतरांना आधार व्हावा आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी या हेतूने मृदुला अजमीरे या चिमुकलीचा जन्मदिन तिच्या आजीने संगीताताई अग्रवाल यांनी घाटंजी समर्थ मुक बधिर विद्यालय येथील मुक बधिर विद्यार्थ्यांच्या उपस्तिथीत शैक्षणिक साहित्य आणि खाऊ वाटप करत हा जन्मदिन साजरा करून सामाजिक बांधलकीचे दर्शन या जन्मदिनाच्या अवचित साधून साजरा केला असता. मूदुलाचे वडील वैभवजी अजमिरे, आई कोमल अजमिरे, रानी मिर्झापुरे आजोबा हरिदास अग्रवाल आणि हे देखिल या ठीकानी उपस्तिथ होते आणि प्रत्येकाने या सामाजिक भावनेने जन्मदिन साजरा करावा असे अवाहन देखिल संगीता अग्रवाल यांनी केले



# मराठी राजभाषा गौरव दिन आणि कवी कुसुमाग्रज यांची जयंती उत्साहात साजरी




**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : मराठी राजभाषा गौरव दिन व कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'संदीप वैभव... आणि कविता' हि वैभव जोशी आणि संदीप खरे यांच्या स्वरचित कवितांची नवी मैफिल आयोजित करण्यात आली होती. या मैफिलीला रसिक श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत नाट्यगृह हाऊसफुल्ल होऊन मराठी राजभाषा दिन आणि कुसुमाग्रज यांची जयंती जणू मराठी भाषेचा गौरव उत्सव म्हणून साजरा झाला. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. संदीप खरे आणि वैभव जोशी यांनी आपल्या लोकप्रिय व हृदयस्पर्शी कवितांचे सादरीकरण करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या काव्यप्रदर्शनाला उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, आणि मराठी भाषेला राज्याच्या अधिकृत भाषेचा दर्जा मिळाला.

## लोकप्रिय व हृदयस्पर्शी कवितांतून श्रोते झाले मंत्रमुग्ध

त्यामुळे, १ मे हा 'मराठी राजभाषा दिन' किंवा 'मराठी भाषा दिन' म्हणून ओळखला जातो. तसेच, २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज,यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने मराठी भाषेच्या गौरवासाठी समर्पित आहे. १ मे हा मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाल्याचा दिवस, तर २७ फेब्रुवारी हा मराठी भाषेच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक योगदानाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. ज्याद्वारे मराठी भाषेचे संवर्धन आणि प्रचार, प्रसार केला जातो. या दिवसाचे महत्व लक्षात घेता राज्यभरात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातात, ज्यामध्ये साहित्यिक कार्यक्रम, व्याख्याने, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असतो. त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या संवर्धन आणि प्रचारासाठी यंदाही भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने ''संदीप वैभव...आणि कविता' हा एक लोकप्रिय मराठी काव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. यामध्ये प्रसिद्ध कवी संदीप खरे आणि वैभव जोशी यांनी आपल्या स्वरचित कवितांचे सादरीकरण करून विविध कवितांद्वारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी उपस्थित रसिक श्रोत्यांनी वाहवा ची दाद दिली.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष केदार साठे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, शहर चिटणीस अमित ओझे, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा राजेश्री वावेकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका वृषाली वावेकर, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, अमोल खेर, गणेश जगताप, चिन्मय समेळ, केदार भगत, रुपेश नागवेकर, प्रीतम म्हात्रे, जितेंद्र वाघमारे, वैभव बुवा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# पनवेल न्यायालय नवीन इमारत येथे मराठी भाषा गौरवदिन संपन्न




**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख । एम.डी.भोईर** : अधिवक्ता परिषद पनवेल यांचे तर्फे मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ साहित्यिक प्रा.एल बी पाटील, उरण यांच्या व्याख्यानाचे आयोजन बार रूम पनवेल येथे केले होते. यावेळी व्यासपीठावर अधिवक्ता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज भुजबळ सर,महामंत्री सुनील तेलगे सर,तालुका महामंत्री अस्मिता भुवड मॅडम, नवी मुंबई युनिटचे अध्यक्ष विशाल जाजु सर,सरकारी वकील थळकर मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या व दत्तोपंत ठेंगडी यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. अधिवक्ता नूतन केणी मॅडम यांनी सूत्रसंचालन केले. आयुष्यात प्रथमच सूत्रसंचालन करत असताना देखील त्यांनी अतिशय उत्तम रीतीने त्यांची जबाबदारी पार पाडली त्यांचे मनापासून अभिनंदन. अधिवक्ता नागेश हिरवे सर यांनी खणखणीत आवाजात प्रस्तावना व वक्ता परिचय करून दिला. तर अस्मिता भुवड मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले.प्रा.एल बी पाटील सर यांनी त्यांच्या मुख्य भाषणामध्ये मराठीतील बोली भाषांचे महत्त्व, छत्रपती शिवाजी महाराज यांचा उज्ज्वल इतिहास व आगरी बोलीतील कविता,समाजाचे प्रश्नांबद्दल प्रबोधन अशा विविध मुद्द्यांना स्पर्श करीत मराठी भाषेचे महत्व जोरकसपणे पटवून दिले.त्यांनंतर अधिवक्ता मनोज भुजबळ सर व थळकर मॅडम यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला वकिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाला नवी मुंबईहून जाजु सर व त्यांचे सहकारी आणि अलिबाग महामंत्री निकेत चवरकर उपस्थित होते.माजी न्यायाधीश हवेलीकर साहेब उपस्थित होते.राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.जिल्हा महामंत्री सुनील तेलगे सर व जिल्हा कार्यालयीन मंत्री मनोज म्हात्रे सर यांच्या प्रेरणेतून व तीव्र इच्छाशक्तीतून कालचा कार्यक्रम घडून आला. अधिवक्ता परिषदेच्या पनवेल युनिटचे मनापासून अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

# धर्माबादेत सतत वाहतूक कोंडी, नागरिक हैराण

## व्यापाऱ्यांची मनमानी व दोन्ही बाजूला गाड्या पार्किंग चा परिणाम

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी । गिरमाजी सुर्यकार** : धर्माबाद शहरात अंतर्गत मार्केट यार्ड ते आंध्र बस स्टॅन्ड पर्यंत मुख्य रस्ता अतिशय अरुंद आहे . हा मुख्य रस्ता अरुंद असल्याने सततची वाहतूक कोंडी शहराच्या नशिबी असून नगरपालिका व वाहतूक पोलीस विभाग हतबल झाले आहेत. शहरातील वर्दळीचे व गर्दीचे ठिकाण असलेले नेहरू चौक, पानसरे चौक, मुख्य बाजारपेठा आदी ठिकाणच्या रस्ते फुटपाथवर दुकानदार अतिक्रमण करून साहित्य विक्रीला ठेवत आहेत. तर दुकानासमोरील फुटपाथच्या पुढे ग्राहकांना दुकानात येण्या-जाण्यासाठी सर्रासपणे लोखंडी जाळी लावली जात आहेत. तसेच रस्त्याच्या एका नव्हेतर, दोन्ही बाजूला बाईकची पार्किंग केली जाते आहे. यावर नगरपलिकेने व वाहतूक विभागाने कारवाईचा हातोडा उगारून सुद्धा" जैसे थे " स्थिती आहे.



तसेच शहराच्या मुख्य रस्त्यावर फळे व भाजीपाला विक्री करणाऱ्या हातगाड्यांची संख्या वाढली असून हे व्यवसायिक आपला हातगाडा घेऊन सतत रस्त्यावरून फिरत असल्याने वाहतूक कोंडीमध्ये आणखीच भर पडत आहे.पोलिसांनी वाहतुकीला कितीही शिस्त लावण्याचे प्रयत्न केले तरीही कोंडी सुटेल याची शाश्वती नसल्याने यापुढे तरी नगरपालिका व प्रशासनाकडून कठोर पावले उचलण्याची गरज असल्याच्या प्रतिक्रिया सर्वच स्तरातून उमटत आहेत.

# उरण विधानसभा २०२४-२०२५ आमसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख । एम.डी.भोईर** : शुक्रवार दि.२८ फेब्रुवार २०२५ रोजी जे.एन.पी.टी.टाऊनशिप येथील मल्टीपर्पज हॉल येथे संपन्न झाली यावेळी उरण तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य,महसूल खात्याचे अधिकारी,पंचायत समितीचे अधिकारी,पोलिस अधिकारी,वाहतुक शाखेचे अधिकारी,पी.डब्लु.डीचे,अधिकारी,सिडकोचे अधिकारी,महावितरणचे अधिका-यासह संबधीत इतर खात्याचे अधिकारी,कर्मचा-यासह उरण तालुक्यातील ग्रामपंचायतीचे सरपंच,उपसरपंच,सदस्यासहित सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी उरण तालुक्यातील नागरिकांना भेडसावणारे अनेक प्रश्न येथील जनतेने संबधीत अधिका-यांना आमसभेचे अध्यक्ष आमदार महेश बालदी यांच्या समोर समस्यांचे पाडेच वाचून व सांगून उरण तालुक्यातील भेडसावणा-या समस्या उपस्थीत केल्या यामध्ये प्रामुख्याने येथील सुशिक्षीत बेरोजगार तरूण-तरूणींच्या रोजगाराचा प्रश्न असेल तसेच येथील दिव्यागांच्या समस्या असतील किंवा येथील जनतेचा पिण्यांच्या पाण्याचा प्रश्न,तर येथील खड्डेमय रस्त्यांचा प्रश्न,बांधबदिस्तीचा प्रश्न असेल,येथील जनतेचा गावठाण विस्तार,अनाधिकृत भंगारवाल्याची लागलेली वाळवी असेल,येथील शासकीय जागांवर झालेले अतिक्रमण,रस्त्यावर अनधिकृत जागोजागी पार्कींग केलेले ट्रक,टेलर,कंटेनर मुळे होणारे अपघात,महावितरणाच्या भोगल कारभारामुळे वेळीअवेळी होणारा विजेचा लपंडाव,येथील सिडकोच्या अडमुठ्या धोरणामुळे पावसाळ्यात सिडको बाधित गावांना शिरणा-या समुद्राच्या तसेच पावसाच्या पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होणेसाठी उपाययोजना अशा अनेक भेडवसाणा-या समस्या येथील नागरिकांनी मांडल्या यावर आमदार महेशशेठ बालदी यांनी संबधीत अधिका-यांना या वरील सर्व समस्यावर जाब विचारला असता संबधित अधिकारी वर्गानी सकारांत्मक उत्तरे देऊन यापुढे येथील नागरिकांना या भेडसावणा-या समस्यांचे येत्या काळात निवारण केले जाईल असे या आमसभेचे अध्यक्ष आमदार महेशशेठ बालदी यांच्या समोर अश्वासीत करून या जनतेच्या निगडित असणा-या समस्यांचे निवारण करून सर्वांनि राष्ट्रगीत म्हणून सभेची सांगता खेळीमेळीच्या वातावरणात होऊन येथील नागरीकांनी समाधान व्यक्त केले तर हि आमसभा वादळी होईल अश्या वावड्या काही दिवस ऐकायला मिळत होत्या पण आजची आमसभा जनताभिमुख ठरली अशी येथे उपस्थीत नागरिकांनी आमच्या प्रतिनिधी जवळ आपल्या भावना व्यक्त केल्या.




# शेती महामंडळ कामगारांच्या प्रश्नांसाठी सागर मिसाळ यांनी दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**
**सणसर । विकास क्षत्रिय** : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पुणे जिल्हा सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाअध्यक्ष सागर मिसाळ यांनी शेती महामंडळाच्या मा.श्री व्यवस्थापकीय संचालक,शेती महामंडळ,यांना दिनांक २८/०२/२०२५ रोजी पुणे येथे देण्यात आले.शेती महामंडळांच्या कामगारांच्या मागण्यासाठी पूर्ण करण्यात याव्यात प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे,तत्कालीन महसूल राज्यमंत्री मा.श्री रामराजे निंबाळकर समितीच्या शिफारसी असाव्या तशा स्विकारुण अमंलबजावणी करावी,सरकारने कामगारांना २ गुंठे जागा देण्यांचे व घर मा: राज्य सरकारने बांधून देण्याचे मान्य करण्यात आले आहे.त्यांची अमंलबजावणी करण्यात यावी.तत्कालीन महसूल मंत्री मा.पतंगरावजी कदम यांच्याशी झालेल्या बैठकीत प्रमाणे शेती महामंडळांच्या संचालक मंडळांच्या ठरावा प्रमाणे कामगारांची देय रक्कम रु. ९९ कोटी ५० लाख देण्याचे उरले असलेली रक्कम दिली गेली नाही ती देण्यांत यावी.५व्या वेतन आयोगाच्या फरक दिलेला नाही तो देण्यात यावा.सन २०१५ साली



६व्या वेतन आयोग देवासनि शेती महामंडळाचे मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी राज्य सरकारकडे मंजुरी-साठी प्रस्ताव पाठविला होता तो हि अदयाप मंजूर केला नाही तो मंजूर करण्यात यावा. कामगारांच्या सर्व देयकमा देण्यात याव्यात.शेती महामंडळांच्या कामगारांच्या वारसांना शिक्षणासाठी मदत करावी असे निवेदन देण्यात आले आहे. अश्या अनेक समस्याचे निवेदन देते वेळी बारामती लोकसभा खासदार सुप्रिया ताई सुळे यांच्या सूचनेनुसार हे निवेदन देण्यात आले असल्याचे जिल्हाअध्यक्ष सागर मिसाळ यांनी सांगितलं.

=====================

# ज. ए. इ. वायु विदयुत बोकरविडा उरण शाळेत मराठी भाषा गौरव दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण । प्रतिनिधी** : २७ फेब्रुवारी हा दिवस "मराठी भाषा गौरव दिन "महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो. कुसुमाग्रजांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आणि मातृभाषेचा गौरव म्हणून कुसुमाग्रज यांच्या स्मृतीला अभिवादन करून त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. हा निर्णय शासनाकडून २१जानेवारी २०१३ रोजी घेण्यात आला.उरण तालुक्यातील जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट वायू विद्युत बोकडविडा या शाळेमध्ये २७ फेब्रुवारी रोजी मराठी राजभाषा दिवस साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी मराठी भाषेचे महत्त्व, तिची समृद्धी प्रदर्शित करण्यासाठी शाळेमध्ये एक सुंदर उपक्रम राबविण्यात आला. तो म्हणजे मराठी भाषेला रांगोळी तून साकारण्यात आले.



या विशेष उपक्रमासाठी मान्यवर लाभले ते श्री अरुण नाना पाटील सहाय्यक शिक्षक जुनियर कॉलेज श्री.अरुण तुकाराम जाधव सहाय्यक शिक्षक एन आय उरण यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडला .मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने या दिनाच्या निमित्ताने सुंदर सुंदर रांगोळ्या मुलांनी आणि शिक्षकांनी साकारल्या. रांगोळी उपक्रमामध्ये इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या मराठी पुस्तकाचे मुखपृष्ठ रांगोळीतून साकारले .सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेश देणारी रांगोळी रेखाटली तर शाळेतील शिक्षकांनीही या विशेष दिवशी मराठी महिने व त्या महिन्यात येणारे सण दाखवणारी भव्य रांगोळी काढून एक आगळावेगळा "रांगोळी महोत्सव" साजरा केला. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ हेमा कवळसे मॅडम यांनी मराठी दिनानिमित्त आपले विचार मांडले आणि सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे कौतुक केले.मराठी राज्य भाषा गौरव दिन २७ फेब्रुवारी हा दिवस "माझ्या मराठीचे बोल कौतुके परी अमृता तही पैजा जिंके ऐसी रसिके अक्षरे मिळविले "असा हा मराठी भाषा दिन साजरा करण्यासाठी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

www.yuvakadhar.in

E mail - dainikyuvakaadhar@gmail.com

facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १६५ वा शनिवार दि. ०१ मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ पान नं : ५ RNI MAHMAR/2023/89514



दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.

मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.

9220403509 संपर्क 9594509661

श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर